Sakal, 31 May 09

# रविवारी 'एनसीएल'मध्ये व्याख्यान

**पुणे, ता. २८:** राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेच्या (एनसीएल) 'एनसीएल ॲकॅडमी'तर्फे येत्या रविवारी (ता. ३१) 'इन्सा युवा शास्त्रज्ञ पुरस्कार'विजेते डॉ. अमोल कुलकर्णी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

'बबल्स अँड ड्रॉप्स : स्टोरीज फ्रॉम डिस्ने लँड, आइस्क्रीम, लॅपटॉप अँड पेट्रोल' या विषयावरील व्याख्यानाला आठवी ते दहावीचे विद्यार्थी आणि विज्ञानाचे शिक्षक उपस्थित राहू शकतील, असे 'एनसीएल'तर्फे कळवण्यात आले आहे.

'एनसीएल इनोव्हेशन पार्क' येथे सकाळी दहा वाजता हे व्याख्यान होणार असून, नावनोंदणीसाठी विद्यार्थ्यांनी outreach@ncl.res.in या 'ई-मेल' पत्त्यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.